आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

०९ मे २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- पाकिस्तानच्या कुरापती सुरूच, नागरी विमानांची ढाल करत सुमारे ४०० ड्रोनच्या सहाय्यानं भारतात ३६ ठिकाणी घुसखोरी करुन हल्ल्याचा प्रयत्न, भारताकडून चोख प्रत्युत्तर

- राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमधे मॉक ड्रील करण्याचे तसंच जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचे निर्देश /महत्त्वाच्या पदांवरच्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ८८० अंकाची घसरण

- सीमाभागातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आयपीएल क्रिकेट सामने आठवडाभरासाठी स्थगित

**आणि**

- खेलो इंडियाच्या पदकतालिकेत महाराष्ट्र अव्वल स्थानी कायम

**<><><><><>**

पाकिस्तानच्या कुरापती सुरूच असून काल रात्री पुन्हा एकदा पश्चिमेकडच्या भारतीय हवाई हद्दीचं उल्लंघन करत घुसखोरी करत हल्ल्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानच्या या कृतीला भारतानं चोख उत्तर दिल्याची माहिती परराष्ट्र आज नवी दिल्लीत घेतलेल्या वार्ताहर परिषदेत परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी, विंग कमांडर व्योमिका सिंह आणि कर्नल सोफिया कुरेशी यांनी दिली. पाकिस्ताननं नागरी विमानांचा ढालीसारखा

वापर करत सुमारे ४०० ड्रोनच्या सहाय्यानं भारतातल्या लेह ते सिरक्रीक दरम्यान ३६ ठिकाणी घुसखोरी करण्याचा प्रयत्न केल्याची माहिती सोफिया कुरेश यांनी दिली. पाकिस्ताननं केलेल्या या कृतीला भारतानं चोख प्रत्युत्तर देत हवाई हल्ल्यांचा कट उधळून लावला. पाकिस्ताननं पाठवलेले ड्रोन भारतानं चार ड्रोनच्या मदतीनं नष्ट केले. पाकिस्तानच्या ड्रोनची फॉरेन्सिक चाचणी केली असता हे ड्रोन तुर्की बनावटीचे असल्याचं स्पष्ट झाल्याचं व्योमिका सिंग यांनी सांगितलं. ड्रोन हल्ल्यांबरोबरच नियंत्रण रेषेजवळ पाकिस्ताननं जोरदार गोळीबार सुरू केला. या गोळीबारात भारतीय लष्कराचे काही जवान जखमी झाले. भारतीय लष्करानं दिलेल्या सडेतोड प्रत्युत्तरात पाकिस्तानचं मोठं नुकसान झाल्याची माहिती सिंग यांनी दिली. कालचे हवाई हल्ले आपण केले नसून हा भारताचा कांगावा असल्याचा दावा पाकिस्ताननं केल्याची माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी दिली. काल जे काही घडलं त्याला भारतानं जबाबदारी सांभाळत चोख उत्तर दिलं असून या हल्ल्याची माहिती आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या बैठकीत देणार असल्याचंही मिसरी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व जिल्ह्यांमधे मॉक ड्रील करण्याचे तसंच जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करण्याचे निर्देश  मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज दिले. पोलीस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातल्या सुरक्षा सज्जतेचा आढावा घेण्यासाठी मुंबईत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते. युद्ध स्थितीत बचावासाठी करण्याच्या विविध हालचालींची माहिती आणि प्रशिक्षण नागरिकांना

विशेषतः विद्यार्थ्यांना द्यावं असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ब्लॅकआऊटच्या वेळी विशेषतः रुग्णालयांबरोबर समन्वय यंत्रणा उभी करावी, मुंबई महानगरविकास क्षेत्रातल्या सर्व महानगरपालिकांना देखील या जनजागृतीत सहभागी करुन घ्यावं, पोलिसांनी अधिक सतर्क राहून गस्त आणि बंदोबस्त वाढवावा अशा सूचना त्यांनी दिल्या.

जिल्हाधिकाऱ्यांना आपत्कालीन निधी आजच मिळणार असून तातडीच्या साहित्याची खरेदी आवश्यकतेनुसार तात्काळ करुन घ्यावी, सैन्याच्या हालचालींचं चित्रीकरण करणं आणि समाजमाध्यमांवर ते प्रसारित करण्याबद्दल तात्काळ गुन्हे दाखल करावे. सायबर सेलनं याकरता समाजमाध्यमांवर लक्ष ठेवावं असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. राज्यातल्या महत्त्वाच्या पदांवरच्या विशेषतः आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागांतल्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, वृत्तवाहिन्या, डिजिटल मंच आणि वार्ताहरांनी भारतीय सशस्त्र दलांच्या हालचाली आणि कारवायांचं थेट प्रक्षेपण करू नये, अशी सूचना संरक्षण मंत्रालयानं आज केली. अशी संवेदनशील आणि गोपनीय माहिती प्रसारित केल्यामुळे सशस्त्र दलांच्या कामात अडथळा येऊन नागरिकांचा जीव धोक्यात येऊ शकतो, असं संरक्षण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशात इंधनाचा पुरेसा साठा असून त्याचं वितरणही सुरळीत सुरू असल्याची माहिती इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड- IOCLनं दिली. नागरिकांनी घाबरून न जाता इंधनाचा अतिरीक्त साठा करू नका आणि अनावश्यक गर्दी टाळा  असं आवाहनही IOCL नं केलं आहे. देशातल्या सर्व केंद्रांवर इंधन आणि एलपीजीचा पुरेसा साठा असल्याचंही IOCL नं सांगितलं आहे.

**<><><><><>**

आपण भारतीय शांतताप्रिय आहोत, युद्ध आपला रस्ता नाही, मात्र आपल्यावर हल्ला झाला तर संरक्षणाची जबाबदारी आपण घेतो, असं प्रतिपादन माजी संरक्षण मंत्री शरद पवार यांनी केलं. सातारा इथं कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. भारतीय सैन्यदलाच्या कामगिरीचा अभिमान वाटतो असंही पवार म्हणाले. पूर्वी सैन्य दलात महिलांना स्थान नव्हतं. मात्र आपल्या संरक्षण मंत्रीपदाच्या कार्यकाळात महिलांना सैन्यदलात ९ टक्के आरक्षण दिला, याचं स्मरण पवार यांनी केलं. महिलांना सैन्यदलात समाविष्ट करण्याचा निर्णय महिला अधिकाऱ्यांनी सार्थ ठरवल्याचं पवार म्हणाले.

**<><><><><>**

आकाशवाणी मुंबई केंद्रावरून प्रसारित होणाऱ्या काही बातमीपत्रांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. त्यानुसार  दुपारी ३चं प्रादेशिक बातमीपत्र ३ वाजून २० मिनिटांनी, संध्याकाळी पाच वाजता प्रसारित होणारं बातमीपत्र ५ वाजून २० मिनिटांनी तर रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र ८ वाजून २० मिनिटांनी प्रसारित होईल.  आकाशवाणी

मुंबईच्या प्रादेशिक वृत्तविभागाचा कार्यक्रम वृत्तविशेष आणि अर्थविशेष संध्याकाळी सव्वासात ऐवजी रात्री साडेआठ वाजता प्रसारित होईल. पुढील आदेश येईपर्यंत हे बदल कायम राहतील.

**<><><><><>**

भारत आणि पाकिस्तानधल्या तणावपूर्ण वातावरणाचा परिणाम आज भारतीय शेअर बाजारांवर झाला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज ८८० अंकाची घसरण झाली, आणि तो ७९ हजार ४५४ अंकावर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २६६ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ८ अंकांवर बंद झाला.

स्टील, पोर्ट्स, सिमेंट या क्षेत्रांमध्ये आज घसरण झाली. दक्षिण कोरियाचा कॉस्पी, शांघाया एसएसई कॉम्पोझिट तसंच हाँगकाँगचा हँगसेंग हे आशियाई शेअर बाजारही आज घसरले. जपानच्या निक्कीमध्ये मात्र आज वाढ दिसून आली.

**<><><><><>**

भारत आणि पाकिस्तान दरम्यान वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं आयपीएलचे आजपासून पुढचे सर्व सामने आठवडाभरासाठी स्थगित केले आहेत. त्यानंतर परिस्थितीचा आढावा घेऊन संबंधितांशी चर्चा करून स्पर्धेचं पुढचं वेळापत्रक जाहीर केलं जाईल, असं बीसीसीआयनं स्पष्ट केलं. सद्यस्थितीत बीसीसीआय देशासोबत खंबीरपणे असून, भारत सरकार, सशस्त्र दल आणि देशवासीयांच्या पाठीशी असल्याचं पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रानं कालच पदकांचं अर्धशतक पूर्ण केलं, आणि आतापर्यंत २३ सुवर्ण, १९ रौप्य आणि १६ कांस्य अशी एकंदर ५८ पदकं पटकावत पदकतालिकेत अव्वल स्थान कायम राखलं आहे. (कर्नाटक ३१ पदकं मिळवून दुसऱ्या स्थानावर, तर पंजाब आणि हरियाणा प्रत्येकी २२ पदकं मिळवून तिसऱ्या स्थानावर आहेत.) नेमबाजी स्पर्धेत, महाराष्ट्राच्या पार्थ माने आणि शांभवी क्षीरसागर यांनी १० मीटर एअर रायफल युवा गटाच्या मिश्र संघामध्ये सुवर्णपदक पटकावलं. या नेमबाजी स्पर्धेत शांभवीचं दुसरं सुवर्णपदक आहे. खो-खो मध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी अभिमानास्पद कामगिरी करत सलग ७ व्यांदा सुवर्ण पदक पटकावलं, तर मुलींच्या संघाला रौप्य पदकावर समाधान मानावं लागलं.

पुरुष आणि महिला अशा दोन्ही सामन्यात महाराष्ट्राला ओडिशा बरोबर लढत द्यावी लागली होती. कर्णधार राज जाधवच्या नेतृत्वाखाली मुलांच्या संघानं ओडिशाला ३४-२५ असं नमवून ९ गुणांनी विजय मिळवला. मुलींच्या संघाला मात्र अंतिम फेरीत ओडिशाकडून पराभव पत्करावा लागला. दोन्ही संघ बलाढ्य असल्यामुळे अंतिम सामना चुरशीचा झाला.

**<><><><><>**

नांदेड जिल्ह्यातल्या शहीद जवान सचिन यादवराव वनंजे यांच्यावर आज देगलूर इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. ६ मे रोजी **श्रीनगरच्या तंगधार इथं जात असताना** सैन्य दलाचं

वाहन खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातात त्यांना वीरमरण आलं. २०१७ मध्ये ते भारतीय सैन्य दलात भरती झाले होते.

<><><><><>

सूरत ते चेन्नई या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या महामार्गामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिक विकास होणार असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिन गडकरी यांनी आज दिली. अहिल्यानगर जिल्ह्यात १ हजार ३८० कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचं भूमिपूजन केल्यानंतर ते बोलत होते.

<><><><><>

२६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर राणा याला आज एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या विशेष न्यायालयानं ६ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी दिली आहे. २८ एप्रिल रोजी १८ दिवसांचा रिमांड संपल्यानंतर राणाला एनआयए कोठडी वाढवण्यासाठी न्यायालयात हजर करण्यात आलं. अमेरिकेतून भारतात नुकतंच प्रत्यार्पण करण्यात आलेल्या राणावर २६/११ च्या हल्ल्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सूचना, माहिती आणि नकाशे असलेले हस्तलिखित नोट्स डेव्हिड हेडलीला दिल्याचा संशय आहे.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय घट झाली. कोकणात काही ठिकाणी किंचित घट झाली.

राज्याच्या चारही विभागांमध्ये आठवडाभर तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. पुढचे चार दिवस तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट, आणि मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**